स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन विषय

“१९९९ नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थिती व भवितव्याचा अभ्यास.”

मानव्यविज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक

भागवत जांबुतराव जाधव
रा.धोतरा ता.हदगाव जि.नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पी.डी.सुर्यवंशी
प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख
स्वा. सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पुर्णा (जं.) जि.परभणी.

❖ प्रस्तावना :-

इंडियन नॅशनल काँग्रेस पक्ष हा भारतातील एक सर्वात जुना व सर्व व्यापी पक्ष आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीत काँग्रेस पक्षाची कामगिरी महत्त्वपूर्ण आहे. इंग्रजी राजवटीतून भारताला मुक्त करण्यासाठी म्हणून भारतीय स्वातंत्र्याची चळवळ मुख्यतः या संघटनेच्या नेतृत्वाखाली होऊन ती सफल झाल्याची दिसते. या पक्षाचे नाव इंग्रजी असूनही खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले. कारण तिने चालविलेली स्वातंत्र्याची चळवळ ही 'जनतेची चळवळ' होती असा विश्वास त्यांनी लोकांमध्ये निर्माण केला. अलीकडील काळात त्या पक्षाची वाताहात होत असली तरीही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा पक्ष आधुनिक जगातल्या महान राजकीय पक्षांपैकी एक आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशातला सुरुवातीच्या काळात एक हाती वर्चस्व असणारा पक्ष म्हणून काँग्रेसची ओळख आहे.

- **महाराष्ट्र काँग्रेस :-**

१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर साठ व सत्तरच्या दशकात प्रभावीरीत्या निर्विवादपणे काँग्रेसचे वर्चस्व होते. १९६२ ला महाराष्ट्राची पहिली विधानसभा निवडणूक पार पडल्यावर काँग्रेस पक्ष सत्तेत आला. महाराष्ट्र स्थापनेपासून ते १९७२ पर्यंत काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रातील स्थान हे एक प्रभुत्वशाली पक्ष या स्वरूपाचे होते. या प्रभुत्वाचा अर्थ केवळ वर्चस्व नव्हे तर सर्वसामान्य जनतेची संमती असा या काळात होता. १९७८ मध्ये महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीचे स्वरूप बदलले. एका प्रभुत्वशाली पक्षाच्या जागी तुलनात्मक बहुपक्ष पद्धती उदयास आली. १९७८ ते १९८० या दरम्यान केंद्राचे नियंत्रण राज्यांवर होते. ८० च्या दशकामध्ये दुबळ्या बहुपक्ष पद्धतीचा विस्तार झाला. १९८० व १९८५ या दोन निवडणुकांमध्ये कमजोर बहुपक्ष पद्धतीचा विस्तार झाला. या दुबळ्या बहुपक्षीय पद्धतीमधूनच ९० च्या दशकाच्या सुरुवातीला आघाडी परंतु बहुपक्ष पद्धतीची सुरुवात झाली. (काँग्रेस, तिसरी आघाडी व शिवसेना-भाजप युती) या टप्प्यात साधारणपणे १९९० ते १९९९ पर्यंत महाराष्ट्र होता. यानंतरचे महाराष्ट्राचे २००४ ते २०१५ या काळातील राजकारण द्विध्रुवीय आघाड्यांच्या पक्षांमध्ये विभागले गेले. शिवसेना-भाजप युती व काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी अशा दोन मुख्य आघाड्यांमध्ये राजकारण होत राहिले. या प्रकारचे राजकारण विधानसभा पातळीवर होते. लोकसभा निवडणुकीत मात्र यामध्ये काही छोटे-मोठे बदल होत राहिले.

महाराष्ट्राचे राजकारण मोठ्या तीन गटात विभागलेले आपणास दिसते. **१**. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस २. आंबेडकरवादी विचार परिवारातील संघटना उदा. आरपीआय, भारिप-बहुजन महासंघ,

बहुजन समाज पक्ष इत्यादी. ३. हिंदुत्ववादी गट. उदा. पूर्वीचा जनसंघ-भाजप शिवसेना इत्यादी. या तीन गटांमध्ये महाराष्ट्रातील राजकीय स्पर्धा आहे. १९९० नंतर बहुपक्ष पद्धती असतानाही मुख्यत: दोन आघाड्यांमध्ये प्रामुख्याने २०१९ पर्यंत सत्तेची स्पर्धा असल्याचे दिसते. हे स्वरूप महाराष्ट्राच्या राजकारणाला कोणत्याही एका पक्षाला निवडणुकीत प्रभावी यश मिळविता येत नसल्याने प्राप्त झाल्याचे दिसते. महाराष्ट्रात आंबेडकरवादी परिवारातील संघटनांना उरलेल्या दोन्ही परिवाराकडून आकर्षित करण्याचे प्रयत्न वेळोवेळी चालू असतात.

- **महाराष्ट्र काँग्रेसच्या राजकारणाचे नेतृत्व :-**

महाराष्ट्राच्या राजकारणाचे नेतृत्व १९९९ च्या आधीच्या काळात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, सुधाकर नाईक, यांच्याकडून झाले आहे. १९९० नंतर वसंतदादा पाटील, ए. यार. अंतुले, विलासराव देशमुख, सुशील कुमार शिंदे यांचे नेतृत्व लाभले. त्यानंतर अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात ही मंडळी आपणास सद्यस्थितीत काँग्रेसमध्ये सक्रिय असल्याचे दिसते. २०१४ नंतर पक्षांतरे आणि पक्ष संघटनेत बदल झाले. त्यातून अनेक नेते विविध पक्षात स्थलांतरित झालेत. महाराष्ट्रामध्ये काँग्रेसने शिवसेनेसोबत सत्ता स्थापन करण्यासारख्या विविध नवीन प्रयोगांना प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रात काँग्रेस संघटनेत प्रादेशिक संतुलन साधण्याचा प्रयत्न करून पक्ष मजबुतीला प्राधान्य देताना दिसते. २०१४ ला शिवसेना-भाजप युती महाराष्ट्र विधानसभेत सत्ताधारी बनल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक फेरबदल घडून आले. या सर्व पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन विषय अभ्यासणे महत्त्वाचा आहे.

❖ **समस्या सुत्रण :-**

१९९९ ला शरद पवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस हा काँग्रेसचा प्रतिस्पर्धी झाला. १९८९ पर्यंत असलेली महाराष्ट्रातील काँग्रेसची मक्तेदारी मोडीत निघण्यास सुरुवात झाली. १९९९ नंतर प्रामुख्याने महाराष्ट्रात काँग्रेस बरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या राजकीय पक्षांचे राजकीय संघटन व प्राबल्य वाढण्यास सुरुवात झाली. काँग्रेसचा प्रमुख विरोधी पक्ष शिवसेना व भाजप हा होता. २००४ च्या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांनी आघाडी करून सत्ता मिळविली. ती आघाडी २०१४ पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात टिकून राहिली. २०१४ ला शिवसेना व भाजप या मित्र पक्षांनी आघाडी सरकारचा पराभव करून सत्ता स्थापन केली. या सत्तांतरानंतर

राज्याच्या राजकारणात बरीच उलथापालत झालेली दिसून येते. या पराभवानंतर काँग्रेसच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले.

महाराष्ट्रामध्ये काँग्रेसच्या पारंपारिक आणि प्रमुख विरोधी पक्ष हा शिवसेना बीजेपी होता. परंतु काळानुरूप काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी एकत्र येऊन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर भाजप विरोधात महाविकास आघाडी स्थापन केली. हा निर्णय कितपत योग्य होता? काँग्रेस आपल्या मूळ तत्वांना बगल देत आहे का? या निर्णयाने काँग्रेसच्या मतदार वर्ग दुरावल का? काँग्रेस सेक्युलरिझम पासून दूर जात आहे का? काँग्रेसला या आघाडीमुळे पुन्हा उभारी मिळेल का? काँग्रेसला निवडणुकांमध्ये पक्षांतर्गत वादाचा फटका बसतोय का? महाराष्ट्रात काँग्रेस नेतृत्व बदलाची आवश्यकता आहे का? पक्षांतर्गत लोकशाही जिवंत आहे का? महाराष्ट्र काँग्रेसच्या अपयशाची कारणे काय? त्यावर उपाय काय? राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेचा महाराष्ट्रात काँग्रेसला कितपत फायदा होईल? महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष कमजोर होण्याचे कारणे काय? सत्ताधारी एनडीएच्या विरोधात काँग्रेस व विरोधकांनी उभी केलेली I.N.D.I.A. आघाडीमुळे काँग्रेसला विरोधकांशी हात मिळवणी करून नवसंजीवनी मिळण्याचा आशावाद का निर्माण झाला? भविष्यात काँग्रेसची धोरणे काय असायला हवीत? काँग्रेस महाराष्ट्रात पुन्हा एक हाती सत्ता स्थापन करेल का? या सर्व प्रश्नांचा शोध घेणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

❖ संशोधन विषयाचे महत्त्व :-

भारताच्या राजकारणात दीर्घकाळ काँग्रेस पक्ष केंद्रस्थानी होता. त्यामुळेच काँग्रेस व्यवस्था हे भारताच्या राजकीय प्रक्रियेचे वर्णन प्रचलित झाले. महाराष्ट्रातही यापेक्षा काही वेगळी स्थिती नव्हती. काँग्रेसच्या या एकहाती वर्चस्वाला १९८९ नंतर धक्का लागला. वारंवार बहुपक्षीय सरकारे सत्तेवर आली. काँग्रेसच्या या पडझडीमुळे पूर्वी जे घटक राजकीय प्रक्रियेत क्षीण होते त्यांचे महत्त्व वाढले. त्यासोबतच नव्या राजकीय पक्षांचा उदय झाला. याच काळात नवीन सामाजिक शक्ती ही राजकीय दृष्टिकोनातून उदयाला आल्या. या स्थित्यंतरामुळे राजकीय प्रक्रियेत 'प्रादेशिक पक्ष व जातीय आधारित राजकारण' हे दोन घटक मध्यवर्ती बनले. हे घटक आधी सुद्धा अस्तित्वात होतेच. पण प्रभावी नव्हते. परंतु आता त्यांचे राजकारणातील महत्त्व वाढले. नवीन स्वरूपात हे घटक क्रियाशील झाले.

जातींचे नवे राजकारण, प्रादेशिक पक्षांचा उदय, कॉंग्रेसचा ऱ्हास, संमिश्र मंत्रिमंडळाचे, आघाड्यांचे राजकारण, घोटाळ्यांचे सत्र, पक्ष फुटी, पक्षांतरे, पक्षांतर्गत मतभेद, मतदारांच्या वाढलेल्या अपेक्षा, सोशल मीडिया व भारतीय जनता पक्षाचा विस्तार हे सर्व मुद्दे साखळीप्रमाणे एकमेकांत गुंतलेले आहेत. १९९९ नंतर त्या सर्वांनी मिळून राजकीय प्रक्रिया साकारली आहे. २००४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि मित्र पक्षांनी मिळून आघाडी करून महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली होती. त्याच आघाडीला यूपीए असे म्हणतात.

१९९५ पासून महाराष्ट्रात कोणत्याही एका पक्षाला एक हाती सत्ता स्थापन करता आली नाही. महाराष्ट्रात सरकारे ही युती आघाडी करूनच अस्तित्वात येताना दिसतात. या परिस्थितीमध्ये भारतीय कॉंग्रेस पक्षाची १९९९ नंतर प्रथमतः शिवसेना-बीजेपी व २००४ ला यूपीए सरकारच्या काळातील राजकीय स्थितीचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण राहील. त्याचप्रमाणे २०१४ ला एनडीएने सत्ता काबीज केल्यानंतर राज्यातील कॉंग्रेसची स्थिती, राजकीय ध्येय धोरणे व राज्यातील त्याच्या स्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस पक्ष यांनी काही अपक्षांना सोबत घेऊन महाविकास आघाडी स्थापन केली. या निर्णयाचा कॉंग्रेस पक्षावरील परिणामांचा आढावा घेऊन पुन्हा तो प्रयोग करण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी कॉंग्रेस प्रयत्नशील असेल. कॉंग्रेस नेतृत्वाचे व पक्षाचे भवितव्य प्रश्नांकित असल्याचे दिसते. या सर्व पार्श्वभूमीवर ही समस्या अभ्यासण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

❖ संशोधनाची उद्दिष्टे :-

१. महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षाचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या राजकीय ध्येय धोरणांचा आढावा घेणे.

३. महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षाला त्यांच्या राजकीय निती मध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे का? त्याचा अभ्यास करणे.

४. तत्कालीन युपीए आणि सध्याच्या महाविकास आघाडीची प्रासंगिकता अभ्यासणे.

५. महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या ऱ्हासाची कारणे अभ्यासणे.

६. महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षाचे भवितव्य काय असेल? ते अभ्यासणे.

७. भारत जोडो यात्रेचे महाराष्ट्राच्या दृष्टीने यश-अपयश अभ्यासणे.

❖ संशोधन विषयाची गृहितके:-

१. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस हा महाराष्ट्र आणि भारतातील सर्वात जुना व महत्त्वपूर्ण पक्ष आहे.

२. महाराष्ट्रात भाजपा आणि त्याच्या मित्र पक्षाचे तगडे आवाहन उभे राहिल्याने कॉंग्रेस पक्षाला आपल्या ध्येयधोरण्यात बदल करावे लागले.

३. कॉंग्रेसला मित्रपक्ष व आघाडी करावी लागली.

४. पक्ष संघटना आणि लोकांचा पक्षावर विश्वास कमी झाला.

५. कॉंग्रेस व मित्र पक्षात समन्वय नाही.

६. भारत जोडो यात्रेने पक्षातील मरगळ काहीशी दूर होण्यास मदत झाली व लोकांचा कॉंग्रेसवरील विश्वास वाढायला मदत झाली.

❖ संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संशोधकाकडून ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधन विषयात संशोधक तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा अवलंब करणार आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, विशिष्टाभ्यास यांचा आधार घेतला जाईल.

दुय्यम स्त्रोतांमध्ये प्रकाशीत ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, विधानसभेतील अधिकृत अहवाल, शासकीय आणि खाजगी संस्थांचे अहवाल, वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इ. साधनांचा उपयोग संशोधन विषयाच्या तथ्य संकलन कार्यात केल्या जाईल.

❖ संशोधन विषयाची व्याप्ती :-

संशोधन करीत असतांना विषयाला वस्तुनिष्ठ व निष्पक्ष स्वरुप यावे यासाठी संशोधन समस्येची व्याप्ती ठरविणे आवश्यक असते. ´१९९९ नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थिती व भवितव्याच्या अभ्यास´ या संशोधन विषयात संशोधक महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाशी संबंधीत संशोधन करणार आहे. त्यात प्रामुख्याने सन १९९९ नंतरच्या राजकीय स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

❖ संशोधन विषयाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा संशोधक प्राथमिक आणि द्वितीय माहितीवर अभ्यास करणार आहे. प्राथमिक माहिती प्रश्नावली, मुलाखत या आधारावर घेतली जाईल व संकलित केली जाईल. परंतू नागरीक / व्यक्ती ती माहिती अचूकपणे देतीलच असे नाही.

द्वितीय सामग्रीवरील आधारीत माहीतीमध्ये विश्वसनीय आकडेवारीचा अभ्यास, शासकीय गोपनीयता व अपूर्ण माहितीमुळे सामग्री संग्रहणावर मर्यादा पडतात. माहितीचा अपुरेपणा ही या विषयासंबंधीची मर्यादा आहे.

❖ संशोधनाचा आराखडा :-

○ प्रकरण पहिले : विषय प्रवेश

प्रस्तुत संशोधन विषयाच्या पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन कार्यासाठी वापरण्यात येणारी संशोधनाची गृहीतके, संशोधन विषयाचे उदिष्ट्ये, संशोधन पध्दती आणि संशोधनाचे महत्व इ. घटकांचा आढावा घेतल्या जाणार आहे.

○ प्रकरण दुसरे : पक्षीय राजकारणाचा पूर्व अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्राच्या राजकारणातील पक्षांचा त्यांच्या राजकारणाचा अभ्यास संशोधक करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पक्ष उदय, त्यांची संख्या, त्यांचे नेतृत्व, त्यांची स्थिती व काँग्रेस संबंधी त्यांची विचारधारा या बाबींचा आढावा यामध्ये घेतला जाईल.

○ प्रकरण तिसरे : महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वाचा ऱ्हास : कारणमीमांसा

प्रस्तुत प्रकरणात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्रभावी असणाऱ्या वर्चस्ववादाची कारणे, त्याच्या ऱ्हासाची कारणे व तो टाळण्यात पक्ष कुठे कमी पडला व त्यावर पक्षाची काय भूमिका होती? या सर्व मुद्द्यांचा अभ्यास केला जाईल.

- **प्रकरण चौथे : काँग्रेसची महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थिती व भवितव्य**

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९९९ नंतरच्या महाराष्ट्र काँग्रेस पक्षाचे राज्याच्या राजकारणात स्थान व भवितव्य या अनुषंगाने मांडणी केली जाणार आहे. यामध्ये युती-आघाडी व्यवस्था, निवडणुका अभ्यास, आघाडीच्या ऱ्हासाची कारणे, पक्षाचे २०१४ व २०१९ च्या निवडणुकीतील स्थिती, २०१९ ला शिवसेनेसोबतच्या महाविकास आघाडीचा आढावा घेण्यात येईल. त्याचबरोबर राहुल गांधींनी २०२३ मध्ये सुरू केलेल्या भारत जोडो यात्रेचा महाराष्ट्रातील काँग्रेस वरील परिणामांचा अभ्यास करणे हा हेतू आहे. भविष्यातील निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेसचे भवितव्य काय राहील व धोरण काय असावे, काँग्रेस पक्षाच्या उभारीसाठी उपाय काय? या सर्व बाबींचा विचार यात केला जाईल.

- **प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी**

प्रस्तुत संशोधन विषयाचे पाचवे प्रकरण हे निष्कर्ष आणि शिफारशींसंबंधीत असून संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी यामध्ये केली जाईल.

❖ संदर्भग्रंथ सूची :-

१. Lele Jayant, One Party Dominance in Maharashtra: Resilience and change, in John R. Wood (ed.) State Parties in Contemporary India Crisis or Continuity? Westview Press, Londen.
२. Niemi Richard G. Herbert F. Weisberg and Devid C. Kimball (ed.) २०११, Controversies in voting bhavior, Washington: CQ press
३. Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande, २००३, Maharashtra: Challenges before the congress system, Journal of Indian School of political economy, Vol.१५, Nos.१ and २, Jan-June.
४. Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande and Nitin Birmal, २०१४, Survival in the Midst of Decline: A decade (१९९९- २००९) of congress rules in Maharashtra, in suhas palshikar, K. C. Suri and Yogendra Yadav (eds.), party competition in Indian states: Electoral Politics in post congress polity, new delhi, OUP, pp.४३-५०.
५. Palshikar Suhas and Nitin Birmal, २००३, Fragmented Marathas Retain Power, in Paul Wallace and Ramashray Roy (ed.) Indias १९९९ Election and Twentieth Century politics, Sage publication , New Delhi.
६. Palshikar Suhas and Nitin Birmal, २००४, Maharashtra : Towards a New Party System in EPW, Vol. No. १८, २००४, pp. ५४६-७२.
७. Palshikar suhas and Rajeshwari Deshpande, १९९९, Maharashtra: electoral politics and structure of Dominance.
८. Vijay singhvi, The congress:Indira to Sonia Gandhi, Kalpaz Publications, २००४
९. Amjad Shaikh, In Between Rahul Gandhi & Congress, Bluerose Publishers, २०२२
१०. V. Appa Swamy, Congress-party-Charitra-siddhantham, Legare Street press,२०२३
११. Gautam Om P. The Indian National Congress:An Analytical Biography, BR Publishing Corporation.
१२. बिरमल नितीन आणि पळशीकर सुहास, महाराष्ट्राचे राजकारण: राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९
१३. घोटाळे विवेक, भाजपाचा विस्तार आणि आवाहन, परिवर्तनाचा वाटसरू १ ते १५ डिसेंबर पान नं. १४.
१४. घोटाळे विवेक, महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकारण (१९८९ ते २००४)एम. फील. लघुशोध प्रबंध (अप्रकाशित), २००५
१५. पळशीकर सुहास आणि सुहास कुलकर्णी, (संपा) महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष, समकालीन प्रकाशन पुणे, २०१०.
१६. पळशीकर सुहास, (संपा) देश प्रदेश: प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा, द युनिक अकॅडमी पब्लिकेशन पुणे.

१७. पळशीकर सुहास, समकालीन भारतीय राजकारण: काँग्रेस वर्चस्वती हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन, २००४.

१८. राजेश कोचरेकर, महासत्तांतर: २०२२ मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा बदलणाऱ्या नाट्यमय घटनांवर आधारित, एकिंग इनोव्हेशन्स, २०२२.

१९. अंकुर तिवारी, इंडियन नॅशनल काँग्रेस इतिहासचे वर्तमान तक, एज्युक्रिएशन पब्लिकेशन, २०२१.

२०. प्राध्यापक शेख मोईन शेख नईम श्री अमजद पठाण, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (देश की जरुरत) नॅशनल प्रेस, २०२१.

२१. राजदीप सरदेसाई,(अनुवाद: निखिल वागळे),२०१४ देशाचा चेहरा बदलणारी निवडणूक, अक्षर प्रकाशन, २०१५.

२२. राजेश पवार, काँग्रेस पुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड पब्लिकेशन्स, २०१६.

२३. रजनी कोठारी, भारत मे राजनीति, ओरियंट ब्लॅकस्वान प्रायव्हेट लिमिटेड, २०१३.

२४. बाबुराव कानडे, काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र, मेहता पब्लिकेशन हाऊस, २०१९.

२५. अमित बगडिया, काँग्रेसमुक्त भारत, प्रभात प्रकाशन, २०२१.

२६. www.eic.in

२७. www.maharashtra.gov.in

२८. www.wikipedia.org

संशोधक

भागवत जांबुतराव जाधव

रा.धोतरा ता.हदगाव जि.नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पी.डी.सुर्यवंशी

प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख
स्वा.सै.सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पुर्णा (जं.)
जि.परभणी.